त्यांच्या प्राविण्य संपादनावर दिसून येत आहे का? या बाबींच्या शोधार्थ प्रस्तुत संशोधन हाती घेतलेले आहे.

**संशोधन समस्या:** "बुलढाणा जिल्ह्यातील महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय, नांद्राकोळी या ग्रामीण भागातील शाळेतील विद्यार्थिनींच्या शैक्षणिक संपादनावर परिणाम करणाऱ्या घटकांचा शोध घेऊन उपाय योजना सुचविणे."

**उद्दिष्टे:**

1. शाळेकडून विद्यार्थिनींना उपलब्ध होणाऱ्या विविध भौतिक सुविधांची माहिती घेणे.
2. शाळेत राबविले जाणारे उपक्रमांविषयी माहिती घेणे.
3. अध्ययन अध्यापन प्रक्रियेविषयी माहिती घेणे.
4. विद्यार्थिनींचा शिक्षणाप्रती दृष्टिकोनाविषयी माहिती प्राप्त करणे.
5. विद्यार्थिनींच्या प्राविण्य संपादनासाठी उपाययोजना सुचविणे.

**व्याप्ती:**

1. बुलढाणा जिल्ह्यातील महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय, नांद्राकोळी या ग्रामीण भागातील शाळेतील इयत्ता नववीच्या विद्यार्थिनींचा संशोधनात समावेश केलेला आहे.
2. भौतिक सुविधा, शैक्षणिक उपक्रम, अध्ययन-अध्यापन प्रक्रिया इ घटकांचा समावेश आहे.
3. इयत्ता नववीच्या विद्यार्थिनींच्या प्राविण्य संपादनाविषयी समावेश प्रस्तुत संशोधनात केलेला आहे.

**मर्यादा:**

1. प्रस्तुत संशोधन हे महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय नांद्राकोळी या शाळेतील इयत्ता नववीच्या विद्यार्थिनींच्या शैक्षणिक संपादनाशी मर्यादित आहे.
2. प्रस्तुत संशोधनात विद्यार्थिनींच्या संपादनावर परिणाम करणाऱ्या भौतिक सुविधा, पालकांचा शिक्षणाप्रती दृष्टिकोण, शैक्षणिक उपक्रम, अध्ययन-अध्यापन पद्धती इत्यादी पूर्तेच मर्यादित आहे.
3. प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष इयत्ता नववीच्या मराठी माध्यमाच्या वर्गातील नमूना गटात समाविष्ट ग्रामीण भागातील विद्यार्थिनीं पुरतेच मर्यादित आहे.

**समस्येचे महत्त्व:**

- प्रस्तुत संशोधनातून विद्यार्थिनींच्या शैक्षणिक संपादनावर परिणाम करणाऱ्या विविध घटकांची माहिती प्राप्त करून घेण्यासाठी शिक्षकांना महत्त्वपूर्ण ठरेल.
- विद्यार्थिनींचा शिक्षणाविषयी दृष्टिकोनाची माहिती प्राप्त होईल.
- विद्यार्थिनींच्या प्राविण संपादनात शालेय अध्ययन-अध्यापन बरोबर इतर कोण-कोणते उपक्रम सहाय्यक किंवा पूरक ठरू शकतात या विषयी माहिती प्राप्त होईल.
- प्रस्तुत संशोधनातून शिक्षक आणि विद्यार्थीनी यांच्यातील अध्ययन-अध्यापन प्रक्रिया विषयी माहिती

प्राप्त होऊ शकते,

- विद्यार्थिनींच्या प्राविण्य संपादनासंदर्भात वृद्धी घडल्यामुळे पुढील वर्गाच्या अभ्यासासाठी प्रस्तुत संशोधन उपयुक्त ठरू शकते.
- विद्यार्थिनींच्या प्राविण्यसंपादनात वृद्धी घडवण्याच्या दृष्टिकोनातून कोण-कोणत्या प्रकारचे बदल घडवून आणता येतील या विषयी माहिती शिक्षकांना प्राप्त होऊ शकते.
- प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष हे विद्यार्थी, विद्यार्थिनीं,शिक्षक, अभ्यासक, तज्ञ व पालकांना मार्गदर्शक तसेच उपयुक्त ठरतील.

**समस्येची गरज:**

- सद्यस्थितीतील विद्यार्थिनींच्या प्राविण्या बाबत माहिती प्राप्त गरजेचे होणे.
- प्राविण्य संपादन कोण-कोणत्या घटकांशी संबंधित आहे.या विषयी माहिती प्राप्त होणे.
- प्राविण्य संपादनात वृद्धी करण्यासाठी उपयुक्त घटकांची माहिती प्राप्त होणे.
- सद्यस्थितीत विद्यार्थिनींची शिक्षणाविषयी दृष्टीकोणाची माहिती प्राप्त होणे.
- अध्ययन-अध्यापन प्रक्रियेची वस्तुस्थिती विषयी माहिती प्राप्त होणे.
- कोणते शालेय,सहशालेय उपक्रम राबविले जातात याविषयी माहिती प्राप्त करणे.
- विद्यार्थिनींच्या पुढील शिक्षणाची तयारी साधणे.

**संशोधन कार्य पद्धती:**

- **संशोधन कार्य पद्धती** - प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला होता. विद्यार्थिनींमध्ये प्रवीण संपादनाच्या स्तराविषयी माहिती प्राप्त करणे व कोणकोणते घटक संबंधित आहेत या विषयी वस्तुस्थितीदर्शक माहिती प्राप्त करण्याच्या दृष्टीने सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात आला होता.
- **नमूना निवड** - प्रस्तुत संशोधनासाठी महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय,नांद्राकोळी येथील इयत्ता नववीच्या वर्गात प्रवेशित सर्व ३९ विद्यार्थिनीं नमुना गटात समावेश करण्यात आला होता.
- **संशोधन साधन** - माहिती संकलनासाठी प्रश्नावली व शिक्षक मुलाखत या दोन तंत्राचा वापर करून शिक्षकांकडून अध्यापन पद्धती व सेवासुविधा संदर्भात तर विद्यार्थिनींकडून प्रश्नावलीच्या आधारे अध्ययन प्रक्रिया संदर्भात माहिती प्राप्त करण्यात आली होती.
- माहितीचे विश्लेषण करण्यासाठी शेकडेवारी या सांख्यिकीय तंत्राचा वापर केला होता आणि विश्लेषणाच्या आधारे पुढील निष्कर्ष काढण्यात आले आहेत.

**संशोधनाचे निष्कर्ष:**

1. शिक्षक शैक्षणिक साधनांचा वापर करीत नाहीत.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME-X, ISSUE- II MARCH - APRIL 2023

Original Research Article

2. क्षमताधिष्ठित अध्यापन प्रक्रिया शिक्षकांकडून घडताना दिसून येत नाही.
3. अध्ययनात विद्यार्थिनीं सक्रिय सहभाग घेत नाहीत.
4. विद्यार्थिनीं अध्ययना संदर्भात घरून मार्गदर्शन प्राप्त होत नाही.
5. ७०% टक्के विद्यार्थिनीं उपक्रमात सहभाग घेण्यात संकोच बाळगतात.
6. ६०% विद्यार्थिनींचा शिक्षणाबाबतचा दृष्टिकोन सकारात्मक होता.
7. शाळेत संगणक कक्ष,वर्ग व बैठक व्यवस्था समुपदेशन मार्गदर्शन सुविधा इत्यादी उपलब्ध आहेत.
8. निबंध, वकृत्व, नाट्य व क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या जातात मात्र विद्यार्थ्यांनी सहभाग फारसा नोंदवत नाहीत.
9. 35 टक्के विद्यार्थिनींना अध्ययन साहित्य उपलब्ध नहोते.
10. ६० टक्के विद्यार्थिनींची कौटुंबिक परिस्थिती साधारण असल्यामुळे त्यांच्या शैक्षणिक सेवा सुविधान संदर्भात परिणाम होत असल्यामुळे शैक्षणिक संपादनावर परिणाम होतो.
11. अध्ययना सोबत घरकाम, शेती व रोजनदारी इत्यादी कार्य विद्यार्थिनींना करावी लागतात.

**संशोधन शिफारशी**

1. अध्यापनात शैक्षणिक साधने अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात, शैक्षणिक साधनांअभावी अध्यापन निरर्थक ठरते. शाळेत अशा प्रकारची साधने उपलब्ध नसतील तर अशा साधनांची उपलब्ध करून किवा निर्मिती करून त्यांच्या आधारे अध्यापन केले जावे.
2. शिक्षकांनी अध्यापनात विविध पद्धती, तंत्र, कौशल्य, प्रतिमाने यांचा वापर करावा विद्यार्थिनींना अध्ययनात अभिरुची निर्माण करणे शिक्षणाविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणे.
3. अध्यापनाच्या प्रसंगी शिक्षकांनी अध्यापन घटकाचे विश्लेषण करून त्याप्रमाणे प्रत्येक विश्लेषीत मुद्द्यावर आधारित क्षमता निश्चित करून अर्थपूर्ण अध्यापन केले असता प्राविण्य संपादनात व अभिरुची निर्माण होण्यात मदत होईल.
4. विद्यार्थिनींसाठी शैक्षणिक व सहशालेय उपक्रमात सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहन,प्रेरणा देणे जेणेकरून सहभाग वाढू शकेल.
5. आर्थिक दृष्ट्या अप्रगत विद्यार्थिनींना शैक्षणिक साधने उपलब्ध होण्यास शाळेमार्फत विशेष मदत केली जावी.
6. ग्रामीण भागातील विद्यार्थीनी ह्या सामान्य व गरीब कुटुंबातील असल्यामुळे अशा विद्यार्थिनींना शिक्षणाविषयी नकारात्मक दृष्टिकोन असण्याची शक्यता नाकारता येत नाही अशा प्रसंगी शिक्षकांनी विद्यार्थिनींना अध्ययनास पूरक अशा संधी उपलब्ध करून देऊन त्यांच्यात शिक्षणाविषयी विचार वृद्धिंगत करणे व अभिरुची जागृत करणे आवश्यक आहे

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME-X, ISSUE- II

MARCH - APRIL 2023

Original Research Article

7. अध्ययना सोबत ज्या विद्यार्थिनींना घरकाम, शेती व रोजनदारी इत्यादी कार्य करावे लागतात अशा विद्यार्थिनींसाठी शाळेमध्ये विशेष शैक्षणिक सेवा पुरविली जावी.

**संदर्भ ग्रंथ सूची:**

कर्डिले वसंतराव व महाले संजीवनी (२०००),"संशोधनात सांख्यिकी तंत्राचे उपयोजन", नाशिक : नित्यनुतन प्रकाशन.

घोरमोडे के. यु. व घोरमोडे क ला (२००८),"षैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे",नागपुर : विद्या प्रकाशन.

पाटील वा. भा. (२०१८),"संशोधनन पध्दती", जळगाव, प्रशांत पब्लिकेशन्स.

रणजित कुमार (२०१७),"संशोधन पध्दती",पुणे, साग पब्लिकेशन्स.

क्रेसवेल जॉन डब्लू (२०१७),"संशोधन संरचना",पुणे, साग पब्लिकेशन्स.

जोशी अनंत (१९९९),"संशोीधन मार्गदर्षक मालिका (१ते१५), नाशिक य.च.म.मु.विद्यापीठ.

**ENGLISH REFERENCE BOOKS:**

1. Best john (2001), "Research in Education", New Delhi, 7th Edition, Prentice Hall of India Pvt.
2. Gearad Guthire (2011), "Basic Research Methods", New Delhi, SAGE Publication India Pvt. Ltd.

**INTERNET WEBSITES: -**

1. www.researchgate.net
2. www.shabdkosh.com
3. https://www.geography.org.uk
4. https://www.studyandexam,com

*Cite This Article:*

***सोनवणे एस.ए.**, (2023).* बुलढाणा जिल्ह्यातील महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय नांद्राकोळी या ग्रामीण भागातील शाळेतील विद्यार्थिनींच्या शैक्षणिक संपादनावर परिणाम करणाऱ्या घटकांचा शोध घेऊन उपाययोजना सुचविणे, ***Educreator Research Journal, Volume–X, Issue– II**, March –April 2023, 231-235.*